सत्यमेव जयते

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ ☎ २२६७ ०२१० /१४८ /२४८,२२६०२२२२ फॅक्स : २२६७३९१५

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎ 2267 0210 /148 /248, 22602222 Fax : 22673915

ई-मेल - sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in

उद्योग अधिकारी (तांत्रिक),महाराष्ट्र उद्योग सेवा, गट-ब

धारिका क्रमांक :११७४(१)/६६६/V।।। **जाहिरात क्रमांक : २२९ / २०१२.**

आयोगामार्फत उद्योग संचालनालयातील, उद्योग अधिकारी (तांत्रिक), महाराष्ट्र उद्योग सेवा, गट-ब या करीता **अकरा** पदांच्या भरतीसाठी **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविऽण्यात येत आहेत. या पदासाठी अर्हताप्राप्त असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.

२. **उपलब्ध पदसंख्या :- सर्व साधारण भरती (४ पदे) व अनुशेषाची (७ पदे)**

						उन्नत व प्रगत गटात न मोडणारे					
अ. क्र.	पदाचे नाव व एकूण पदसंख्या		अराखीव	अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित	अनुसूचित जमाती	वि.जा. (अ)	भ.ज.(ब)	वि.मा.प्र.	भ.ज.(क)	भ.ज.(ड)	इ.मा.व.
१	उद्योग अधिकारी (तांत्रिक), गट-ब		३	१■	१■	---	१■	---	१■	---	१■
	सर्व साधारण भरती (४पदे) व अनुशेषाची (७पदे) एकूण पदे -११	महिला -	१	१■	---	१■	---	---	---	---	---
		खेळाडू -	---	---	---	---	---	---	---	---	---
		अपंग	------								

(■अनुशेषाची पदे)

२.१ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

२.२ शासन आदेशानुसार वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क) व भ.ज.(ड) वर्गवारीसाठी राखीव असलेले पद आंतर परिवर्तनीय असून सदर वर्गवारीतील पात्र उमेदवार न आढळल्यास सदर पद वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क) व भ.ज.(ड) वर्गवारीतील उमेदवारांमधून भरण्यात येतील.

२.३ शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने क्र.आयएसटी-२०११/३००/प्र.क्र.६०५/उद्योग-३, दि.२० ऑगस्ट, २०११ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार **प्रस्तुत पदासाठी अपंगांसाठी पदे आरक्षित नाहीत**. परंतु शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय क्र.आयएसटी-२०१०/प्र.क्र.६८२/उद्योग-३, दि.१९ जानेवारी, २०११ अन्वये खालील अपंगत्व असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी पात्र आहेत. तसेच शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय, क्र.न्यायाप्र-२०११/प्र.क्र.४/सुधार-३, दि.१७ मार्च, २०११ अन्वये खालील अपंगत्व असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी पात्र आहेत.

(अ) चलनवलनविषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायु (Locomotar disability or Cerebral palsy),

(ब) श्रवणशक्तीतील दोष (H.H.),

(क) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी (Blindness or Low Vision).

३. वेतनश्रेणी- ९३०० – ३४,८०० + ग्रेड पे ४,४००/-

४. पात्रता विषयक अटी

४.१ भारतीय नागरिक.

४.२ वयोमर्यादा:- **दिनांक १ जुलै, २०१२** रोजी **३३** वर्षा पेक्षा जास्त नसावे.

४.३ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

४.३.१ मागासवर्गीयांसाठी वयोमर्यादा ५ वर्षे शिथिलक्षम,

४.३.२ महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असलेल्या व्यक्तींच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा लागू नाही.

४.३.३ शासन आदेशानुसार माजी सैनिक, अपंग व खेळाडू इत्यादीसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

४.४ शैक्षणिक अर्हता :-१) अभियांत्रिकी [स्थापत्य अभियांत्रिकी विषयाशी संलग्न असलेले स्थापत्य अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, नगर रचना इत्यादी विषय वगळून] अथवा तंत्रशास्त्रातील पदवी **किंवा**

२) विज्ञान शाखेतील दुस-या वर्गातील पदवी **किंवा**

३) मान्यताप्राप्त संस्थेमधील वरील (१) मध्ये नमूद केलेल्या विषयातील दुसऱ्या वर्गातीलपदविका **आणि तद्नंतर**

४.५ अनुभव :- मान्यताप्राप्त संस्थेतून शिकविण्याचा किंवा रासायनिक प्रयोगशाळेतील संशोधनाचा किंवा उत्पादित मालाची तपासणी करण्याच्या अनुभवासह शासकीय किंवा निमशासकीय किंवा औद्योगिक अथवा व्यापारी उपक्रमातील प्रशासकीय किंवा तांत्रिक जबाबदा-या असलेल्या जबाबदारीच्या पदावरील प्रत्यक्ष कामाचा तीन वर्षाचा अनुभव. ४.४ मध्ये नमूद केलेली अभियांत्रिकीमधील पदवी किंवा पदविका आणि व्यवस्थापन किंवा व्यवसाय प्रशासन मधील पदव्युत्तर पदवी धारक उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.

५. प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव याच्या आधारे निकष निश्चित करुन अथवा **चाळणी परीक्षेव्दारे** मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि/अथवा अनुभव शिथील केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल.

६. **कर्तव्ये व जबाबदाऱ्या** - प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

७. प्रस्तुत पदांना शासनाने दिनांक ८ जून २०१० रोजी निर्गमित केलेली "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप याबाबत नियमावली २०१०" लागू आहे.

८. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

९. शुल्क :९.१ अमागास - रु.४१०/- **९.२** मागासवर्गीय - रु.२१०/-

१०. अर्ज करण्याची पद्धत-

१०.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

१०.२ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे दिनांक **१९ मार्च, २०१२** ते दिनांक **१६ एप्रिल, २०१२** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

१०.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल.

१०.४ विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१०.५ आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पध्दतीने भरता येईल :-
(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे **(२)** क्रेडिट कार्ड **(३)** डेबिट कार्ड **(४)** नेटबँकिंग **(५)** कॅश कार्ड

१०.६ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरल्यावर, दोन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसानंतर (Working Days) उमेदवाराच्या मोबाईल क्रमांकावर आयोगास रक्कम प्राप्त झाल्याबाबतचा (Transaction ID Updated Successfully) एस.एम.एस. आयोगाकडून पाठविण्यात येईल. तसेच उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये Application Status द्वारे रक्कम प्राप्त झाल्याबाबत सूचना प्राप्त होईल.

१०.७ विहित पध्दतीने अर्ज सादर करुन परीक्षा शुल्क क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, नेटबँकिंग अथवा कॅश कार्डद्वारे भरल्यानंतर उमेदवारांच्या मोबाईल क्रमांकावर आयोगास रक्कम प्राप्त झाल्याबाबतचा (Payment Received) एस.एम.एस.आयोगाकडून पाठविण्यात येईल. तसेच उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये Application Status द्वारे रक्कम प्राप्त झाल्याबाबत सूचना प्राप्त होईल.

१०.८ दोन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसानंतर आयोगाकडून एस.एम.एस.प्राप्त न झाल्यास अथवा प्रोफाईलद्वारे सूचना प्राप्त न झाल्यास ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या Feedback द्वारे Registration ID, Transaction ID व चलनावरील बँकेत रक्कम भरल्याचा दिनांक पाठवावा.

१०.९ प्रस्तुत परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१०.१० परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

११. **विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक १६ एप्रिल, २०१२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

१२. चलनाव्दारे विहित शुल्क भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक **१७ एप्रिल, २०१२** रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे.

नि.श.पटवर्धन
उपसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुंबई :
दिनाक : १९ मार्च, २०१२